दिनांक : 31.8.2020

प्रति,

मा. आयुक्त,

पुणे महानगरपालिका.

**विषय : मूर्तीदान (गणेशमूर्ती संकलन) उपक्रम त्वरित थांबवावा आणि दान घेतलेल्या गणेशमूर्तींची विक्री करण्याची अशासकीय संस्थांना अनुमती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, यांविषयी ...**

महोदय,

यंदाच्या वर्षी कोरोना महामारीचे निमित्त करून पुणे महानगरपालिकेने मूर्तीदान (गणेशमूर्ती संकलन) उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात राबवला; मात्र हा उपक्रम म्हणजे हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवण्याचाच प्रकार असल्याचे एका 'स्टिंग ऑपरेशन' मध्ये उघड झाले आहे. पुण्यातील विमाननगर भागातील 'स्प्लेंडिड व्हिजन' या नोंदणीकृत नसणाऱ्या सामाजिक संस्थेने महापालिकेला पत्र पाठवून दान केलेल्या मूर्ती संकलित करण्याची आणि पुढील वर्षी विक्री करण्याची अनुमती मागितली. या पत्रानुसार पालिकेचे सहआयुक्त श्री. राजेश बनकर यांनी 'स्प्लेंडिड व्हिजन' ला अनुमतीचे पत्रही दिले. 'स्प्लेंडिड व्हिजन' कडून या गणेशमूर्तींची अवैधरित्या अल्प दरात विक्री होत असून त्यांच्याकडे वीस हजार मूर्ती असल्याचे समजते. शास्त्राप्रमाणे श्री गणेशमूर्तीचे नैसर्गिक जलस्त्रोतात किंवा वहात्या पाण्यात विसर्जन होणे अपेक्षित आहे; मात्र यंदा कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने नदीपात्रातील घाट मूर्तीविसर्जनासाठी पूर्णतः बंद केले, याची कोणतीही पूर्वकल्पना नागरिकांना दिली नाही. एकप्रकारे हा निर्णय पुणेकरांवर लादला आहे; मात्र कृत्रिम हौदांच्या ठिकाणी सर्रासपणे शासनाचे नियम धाब्यावर बसवून कोणतेही 'सोशल डिस्टंसिंग' पाळले जात नसल्याचे दिसून येते. मग भाविकांना नियम पाळून नदीपात्रात विसर्जनावर बंदी का, हा प्रश्न पुणेकरांना पडला आहे. यासंदर्भात

१. अशास्त्रीय मूर्तीदान उपक्रम राबवण्यामागे पालिका प्रशासनाचे आर्थिक हितसंबंध आहेत का ?

२. ‘स्टिंग ऑपरेशन’ द्वारे ‘स्प्लेंडिड व्हिजन’ या एका संस्थेचा कारनामा उघड झाला आहे. अशा ‘किती संस्थांना महापालिकेने गणेशमूर्त्यांची परस्पर विक्री करण्याची अनुमती दिली आहे ?

३. पालिका प्रशासन आणि सामाजिक संस्था यांना अशा प्रकारे विसर्जनासाठी दान घेतलेल्या मूर्ती परस्पर विकण्याचा अधिकार आहे का ? ‘सेक्युलर’ प्रशासनाला श्री गणपती विकण्याचा अधिकार कुणी दिला ?

४. या मूर्तींच्या विक्रीतून मिळणारे लाखो रुपये कुणाच्या खिशात जाणार आहेत ?

५. उत्तरपूजा झालेल्या गणेशमूर्तींचे विसर्जन न करता पुन्हा रंगरंगोटी करून विक्री करणे, हे धर्मशास्त्रानुसार योग्य आहे का, याबाबत पालिकेने काय अभ्यास केला आहे ?

असे अनेक प्रश्न महापालिकेच्या भोंगळ कारभारामुळे निर्माण झाले आहेत.

याआधीही महापालिका प्रशासनाने कृत्रिम हौद, अमोनियम बायकार्बोिनेट यांसारखे अशास्त्रीय उपक्रम राबवले होते. यंदाच्या वर्षी ‘पर्यावरणपूरक गणेश विसर्जन फिरता रथ’ अर्थात ‘फिरता कृत्रिम हौद’ यासाठी सजावट करून कचराकुंड्या वापरून गणेशभक्तांच्या धार्मिक भावनांना ठेच पोचवली आहेच.

* या संदर्भात समस्त गणेशभक्तांच्या वतीने आम्ही पुढीलप्रमाणे मागण्या करत आहोत -

१. ‘मूर्तीदान घोटाळ्या’ ची उच्चस्तरीय सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच दान घेतलेल्या मूर्तींची विक्री करून हिंदूंच्या धार्मिक भावना पायदळी तुडवणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन करण्यात यावे.

२. ‘सोशल डिस्टन्सिंग’ चे नियम पाळत हौदात विसर्जन करण्याची अनुमती दिली जाते, तर नदीपात्रात विसर्जन करण्यासाठी पालिकेने गणेशोत्सवाच्या दहाव्या दिवशी नदीपात्र खुले करावे. तसेच नदीमध्ये मुबलक पाणी सोडण्याची व्यवस्था करावी.

३. पालिका प्रशासनाकडून, तसेच ‘स्प्लेंडीड व्हिजन’ सारख्या मूर्तीदान स्वीकारणाऱ्या सर्व अशासकीय संस्थांना मूर्ती संकलन करणे त्वरित थांबवण्यास सांगावे.

४. आतापर्यंत किती मूर्ती कोणत्या संस्थांनी संकलित केल्या आहेत, त्यांचे पुढे काय केले आहे, किती मूर्तींची विक्री केली आहे, या सर्व गोष्टींचा लेखाजोगा पालिका प्रशासनाने पुणेकरांसमोर मांडावा.

५. यापुढे हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक कृतींमध्ये ‘सेक्युलर’ प्रशासनाने ढवळाढवळ करू नये.

पालिका प्रशासनाकडून गणेशमूर्तींची विटंबना झाल्याचे यापूर्वीही अनेकदा उघड झाले आहे. मूर्ती खाणीत टाकणे, मूर्तींवर बुलडोझर फिरवणे, हौदातील मूर्ती पुन्हा नदीपात्रात टाकणे आदी प्रकार हिंदूंनी सहन केले. आता मूर्ती विकण्याचा प्रकार आम्ही कदापि सहन करणार नाही. या प्रकरणी पालिका प्रशासनाने दखल घेतली नाही आणि गणेशभक्तांच्या भावना दुखावल्याने काही परिस्थिती उद्भवली, तर त्याला पालिका प्रशासन जबाबदार असेल, याची पालिकेने नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,